# ई - पोलीस पत्रिका

दि २७/०६/२०२२ अनु.क्र. ११८

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१.पोआअ/आस्था-५/अर्जित रजा-मपोशि-मोरे/६९६३/२०२२दि.२७/०६/२०२२**

## आदेश

महिला पोलीस शिपाई/१५९९,अर्चन गणेश मोरे ,नेमणुक पो.स्टे.बडनेरा, अमरावती शहर यांना त्यांचे मुलाचे उपचाराकरिता १५ दिवस अर्जित रजा महाराष्ट्र नागरी सेवा(रजा)नियम, १९८१ मधील नियम ५० तरतुदीप्रमाणे रजेवर सुटल्याच्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिमआदेश/चालकपोशि-१५८गिरपुंजे/६९६७/२०२२दि.२७/०६/२००२**

## आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/चालक पोशि-१५८५ गिरपुंजे/५६२३/२०२२ अमरावती शहर, दिनांक १८/०५/२०२२

**कसुरदारचे नाव** :- चालक पोशि/१५८५ सुनिल गिरपुंजे, नेमणुक पोलसी स्टेशन बडनेरा (संलग्न मोटार परिवहन विभाग), अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही चालक पोशि/१५८५ सुनिल गिरपुंजे, पोलीस स्टेशन बडनेरा (संलग्न मोटार परिवहन विभाग), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन आपण चालक पदावर नेमणुकीस असुन दारु पिण्याचे सवईचे आहे. दारु चे नशेत सरकारी (शासकीय) वाहन चालवुन आपल्या कडुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपली दिनांक १९/०४/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. पासुन ते २१.०० वा. डयुटी होती. परंतु आपण कर्तव्यावर आले नाही. किंवा पोलीस स्टेशनला सुचना सुध्दा दिली नाही. म्हणुन आपली पोलीस स्टेशन डायरी साना क्र. २७/२२, वेळ ११.५२ वा. गैरहजेरीची नोंद करण्यात आली. त्यानंतर आपण दुपारी ०४.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन ला हजर आले व पोलीस स्टेशनचे इतर चालक अंमलदार यांचे सोबत वाद करुन त्यांना शिवीगाळ केली. व पोलीस स्टेशन पथम मोबाईलची चाबी फेकुन दिली. तसेच चालक रुम चा दरवाजा तोडुन टाकला. त्याबाबत पोलीस स्टेशनचे स्टेशन डायरी साना क्र. ५७/२२, वेळ २०.४१ वा. नोंद करण्यात आली. आपल्या अशा प्रकारचे वागणुकी मुळे पोलीसांची प्रतिमा मलिन होते. म्हणुन कर्तव्यावर दारु पिवु नये.असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ठाणेदार यांनी आपणास वारंवार सुचित केले असुन आपण वरिष्ठांच्या आदेशाकडे व सुचनाकडे दुरलक्ष करुन दारुच्या सवईचे असुन आपल्या वर्तनात कोणतीही सुधारणा नसुन आपण कर्तव्यावर कसुरी केलेला आहे. कसुरतरी ही आपण खुपच दारु पिण्याचे व्यसनाधिन झालेले आहे. आपल्या वागणुकित कोणतीही सुधारणा झालेली नाही.

तरी तुम्ही अशाप्रकारे शिस्तबंद पोलीस खात्यात जबाबदार चालक पोलीस शिपाई पदावर असतांना आपण कर्तव्यावर दारु पिवुन राहण्यामुळे जनमानसात व लोकांमध्ये पोलीसांची प्रतिमा मलिन होत असुन आपण दारु पिण्याचे सवईचे झाले असुन आपल्या या सवई मुळे आपल्या कडुन सरकारी (शासकीय) वाहन चालवित असतांना अपघात होवुन एकादी जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या बेशिस्त, बेजबाबदार व गैरवर्तन कसुरी बद्दल आपणास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) का रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीस तुम्ही दिनांक २०/०५/२०२२ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केले आहे. सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्ती व समाधानकारक न वाटल्याने आपणास कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

उपरोक्त नमुद कसुरदार यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **"देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.**

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**(के.एल.शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रती, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/सीसीटीएनएस